# पाणी संवर्धन कार्यक्रम 2018-19

**दि. २९ डिसेंबर २०१८ ते ०४ जानेवारी २०१९**

**टेकडीवर पाणी संवर्धन :**

मौजे कासारगाव येथील विशेष युवक शिबिराच्या कालखंडात गावाच्या नजदीक असलेल्या टेकडीवर ग्रामस्थांच्या सहकार्याने शिबिरार्थी स्वयंसेवकांनी सुमारे पाच एक्कर परिसरात फरोज तयार करून पावसाळ्यात जमिनीची धूप थांबवण्यासाठी व पाणी संवर्धन करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यात आला. उपक्रमाप्रसंगी मौजे कासारगावातील सरपंच श्री. मोहिते उपसरपंच व गावातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे शिबिरार्थी स्वयंसेवकांना सहकार्य केले व गावामध्ये एक आगळा-वेगळा उपक्रम राबविला. या वेळी महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकाऱ्यांनी गावात पुढाकार घेत एकात्मतेची भावना निर्माण केली व विशेष योगदान दिले. हा पाणी संवर्धनाचा कार्यक्रम गावकऱ्यांच्या सहभागातून राबविण्यात आला. यामध्ये रासेयोच्या १७५ स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामध्ये मध्ये कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. पुष्पलता कावळे, प्रा. विजय गवळी यांनी विद्यार्थ्यांना पाणी संवर्धनाच्या तंत्राची माहिती देत भोकरंबा गावामध्ये शेततळे, बंधारे यामधील गाळ उपसा केला.

